## शिलेगाव सोसायटी अध्यक्षांच्या विरोधातील अविश्वास ठराव मंजूर

**राहुरी (प्रतिनिधी)**– राहुरी तालुक्यातील शिलेगाव येथील विकास सेवा संस्थेच्या सात संचालकांनी अध्यक्षाच्या विरोधात दाखल केलेला अविश्वास ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला आहे. शिलेगाव सेवा संस्थेचे संचालक कैलास अंबादास म्हसे व इतर सहा संचालकांनी संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब बाबासाहेब म्हसे यांच्या विरोधात राहुरीच्या सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयाकडे दि. ९ एप्रिल रोजी अविश्वासाचा प्रस्ताव दाखल केला होता. त्यानुसार सहाय्यक निबंधक कार्यालयाकडून संस्थेच्या सर्व संचालक मंडळाच्या सभेची नोटीस बजावण्यात आली. दि. २५ एप्रिल रोजी राहुरीचे सहकारी संस्थेचे सहाय्यक निबंधक दीपक पराये यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेच्या संचालकांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत १० विरूध्द ० अशा फरकाने अविश्वास ठराव मागणीचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. यावेळी संस्थेचे ३ संचालक गैरहजर होते.

सार्वमत ५० सुवर्णमहोत्सव १९७६-२०२६

## ग्रामीण वाचकांच्या पसंतीस उतरलेले दैनिक सार्वमत

सन १९७६ मध्ये श्रीरामपूर सारख्या तालुक्याच्या ठिकाणी दैनिक सार्वमत चा शुभारंभ झाला. त्या काळात वृत्तपत्र म्हणजे काय हे अनेकांना माहिती नव्हते. अगदी त्याच काळात सार्वमत सुरू झाले. आणि अल्पावधीतच उत्तर नगर मधील प्रत्येक गावागावात, घराघरात लोकप्रिय झाले. ग्रामीण भागातील प्रत्येक समस्यांचा अगदी आपुलकीने वाचा फोडून त्याचा निपटारा करण्याचे काम दैनिक सार्वमत आजपर्यंत करत आहे, आणि यापुढेही करणार. त्यामुळे ग्रामीण वाचकांच्या पसंतीस उतरलेले दैनिक म्हणून सार्वमत चा उल्लेख होतो.

दैनिक सार्वमत टीमने विविध बातम्यांना प्रसिद्धी देताना कधी ही अतिरेक केला नाही. वाईटांचे क्षालन व चांगल्याचे पालन हे धोरण स्विकारून नेहमी अन्याय पिडितांना न्याय देण्याची भूमिका घेतली. गेली अनेक वर्ष त्या काळी तालुका पातळीवर प्रसिध्द होणारे वृत्तपत्र हे जिल्ह्याचे मुखपत्र कधी झाले हे कळालेच नाही. कामगार, कष्टकरी, शेतकरी–व्यापारी यांच्या प्रश्नांना शासन दरबारी मांडून ते प्रश्न सोडविण्यासाठी आमदार, खासदार, मंत्री यांना नेहमी भाग पाडले आहे. यांचे अनेक उदाहरण आहेत. शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. त्यांच्या उत्पादित मालाला चांगला हमी भाव मिळावा म्हणून त्यांना त्यांचे हक्क मिळावे, यासाठी दैनिक सार्वमतने नेहमी आवाज उठविला आहे. याचबरोबर ग्रामीण भागातील एक महत्त्वाचा प्रश्न शेती पूरक व्यवसाय अनेक समस्यांनी व अडचणींनी घेरलेले आहेत. दुधाच्या दराचा महत्त्वाचा प्रश्न नेहमीच ऐरणीवर आलेला आहे. अनेक सुशिक्षित बेरोजगार तरुण दुग्ध व्यवसायाकडे वळाले आहेत. दुधाच्या दरात वर्षभरामध्ये अनेक वेळा चढ–उतार होत असतात. दुधाला किमान ४५ रुपये दर आवश्यक असताना सध्या दुधाला अत्यल्प दर मिळत आहे. त्यामुळे शासन स्तरावर या महत्त्वाच्या विषयाचा विचार व्हावा हीच मागणी ग्रामीण भागातील समस्त दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने मी करतो.



**मोहनराव रामदारस उंडे**
माजी ग्रामपंचायत
सदस्य पढेगाव
मो. ७७०९७२७२७४

दूध दरा संदर्भातील अनेक महत्त्वाचे आंदोलने शेतकरी संघटनेने हाती घेतली होती. त्या प्रत्येक आंदोलनांना तितक्याच ताकतीने प्रसिद्धी देऊन शासनाला दूध दरा संदर्भात सकारात्मक निर्णय घेणे भाग पाडले, याचे सर्व श्रेय हे सार्वमतलाच जाते. दूध धंद्याबरोबरच ग्रामीण भागातील रस्ते, वीज, पाणी व शेतकऱ्यांच्या प्रश्नांना दैनिक सार्वमतने प्रसिद्धी देऊन ते तडीस जाईपर्यंत आपल्या लेखणीतून पाठपुरावा केला आहे. दररोज आपल्या अंकात शेतकरी हा केंद्रबिंदू मानून शेतकऱ्यांच्या दैनंदिन समस्यांना शासन दरबारी पोहचवण्यासाठी हे दैनिक एक 'दूत' ठरले आहे. ग्रामिण भागातील रस्त्यांची दुरावस्था, शेतमालाचे बाजारभाव, दूध दर, राजकीय, सामाजिक परिस्थिती, दूध भेसळ आदींवर निर्भीडपणे लिखाण करून अनेक समस्यांचा निपटारा सार्वमत ने केला आहे. सार्वमतने ही परंपरा अखंडपणे ५० वर्षे सुरु ठेवुन सुवर्ण महोत्सवी वर्ष यंदा साजरे करत आहे. या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सार्वमत परीवाराला कोटी कोटी शुभेच्छा...

आपला सार्वमत

## सोनई, कुकाणा, भानसहिवरेचे सरपंचपद ओबीसी महिलांसाठी तर बेलपिंपळगाव, सलाबतपूर व पाचेगावात सर्वसाधारण महिला

### मुकिंदपूरमध्ये अनुसूचित जाती व्यक्ती तर जळके बुद्रुकला अनुसूचित जमाती महिलेला संधी

**नेवासा (प्रतिनिधी)**– नेवासा तालुक्यातील सरपंच पदाचे विविध प्रवर्गनिहाय आरक्षण निश्चित झाल्यानंतर शुक्रवारी प्रवर्गनिहाय महिलांचे आरक्षण जाहीर करण्यात आले.

तालुक्यात असलेल्या एकूण ११४ ग्रामपंचायतींपैकी ५ मार्च २०२० ते ४ मार्च २०२५ या कालावधीतील मुदत संपणाऱ्या २६ ग्रामपंचायतींकरीता जानेवारी २०२१ मध्ये सरपंच आरक्षण काढण्यात आलेले असल्याने उर्वरीत ८८ ग्रामपंचायतींचे सरपंच पदाचे आरक्षण सोडत पद्धतीने तसेच आळीपाळीने (रोटेशन) पद्धतीने २३ मार्चला निश्चित केले होते. शुक्रवारी त्या त्या प्रवर्गातील आरक्षीत ग्रामपंचायतींमधून महिला सरपंचांसाठी ग्रामपंचायती निश्चित करण्यात आल्या. उर्वरीत ग्रामपंचायतींचे सरपंचपद त्या त्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी निश्चित करण्यात आले.

महिला व व्यक्ती नुसार निश्चित झालेले पाच वर्षांसाठीचे अंतिम आरक्षण पुढीलप्रमाणे

**अनुसूचित जाती (१८)– महिला (९)**– अंमळनेर, खुणेगाव, उस्थळखालसा, बऱ्हाणपूर, सुरेगावगंगा मांडेगव्हाण, जानेवारी २०२१ मध्ये अनुसूचित जातीसाठी आरक्षण निश्चित केलेल्या ग्रामपंचायती– सुकळी खुर्द, खेडलेकाजळी, खामगाव.

**व्यक्ती (९)**– रामडोह, शहापूर, गोणेगाव, लांडेवाडी, शिंगणापूर, बेल्हेकरवाडी, मुकिंदपूर, जानेवारी २०२१ मध्ये अनुसूचित जातीसाठी आरक्षण निश्चित केलेल्या ग्रामपंचायती– धनगरवाडी, गोमळवाडी.

**अनुसूचित जमाती (९)– महिला (५)**– पानेगाव, वाटापूर, निंभारी, जळके बुद्रुक, जानेवारी २०२१ मध्ये अनुसूचित जमातीसाठी आरक्षण निश्चित केलेली ग्रामपंचायत– गोगलगाव.

**व्यक्ती (४)**– कारेगाव, जैनपूर, गोंडेगाव, जानेवारी २०२१ मध्ये अनुसूचित जमातीसाठी आरक्षण निश्चित केलेली ग्रामपंचायत– गिडेगाव.

**ना. मा. प्रवर्ग (३१)–महिला (१६)**– कुकाणा, पुनतगाव, सोनई, खडका, देडगाव, भानसहिवरे, नारायणवाडी, घोगरगाव, भेंडा बुद्रुक, मंगळापूर, दिघी, जानेवारी २०२१ मध्ये ना. मा. प्रवर्गासाठी आरक्षण निश्चित केलेल्या ग्रामपंचायती– अंतरवाली, नांदूरशिकारी, लोहारवाडी, शिरसगाव, गणेशवाडी.

**व्यक्ती (१५)**– खुपटी, भालगाव, फत्तेपूर, गोधेगाव, कांगोणी, करजगाव, रस्तापूर, चिंचबन, नवीन चांदगाव, नागापूर, मुरमे, जळके खुर्द, भेंडे खुर्द, पाथरवाला, गोपाळपूर.

**सर्वसाधारण (५६)– महिला (२८)**–माळीचिंचोरा, शिरेगाव, वडाळा बहिरोबा, कौठा, जेऊर हैबती, माका, बेलपिंपळगाव, चांदा, रांजणगाव, सौंदाळा, बहिरवाडी, पाचुंदे, खरवंडी, सलाबतपूर, पाचेगाव, टोका, शिंगवे तुकाई, वरखेड, नजिक चिंचोली, सुलतानपूर, जानेवारी २०२१ मध्ये सर्वसाधारणसाठी आरक्षण निश्चित केलेल्या ग्रामपंचायती– बेलपांढरी, चिलेखनवाडी, घोडेगाव, महालक्ष्मीहिवरे, राजेगाव, तामसवाडी, वडुले, झापवाडी.

**व्यक्ती (२८)**– पानसवाडी, खेडलेपरमानंद, उस्थळदुमाला, तरवडी, वाकडी, बाभुळखेडे, बकुपिंपळगाव, देवगाव, देवसडे, गळनिंब, गेवराई, हंडीनिमगाव, हिंगोणी, मक्तापूर, लोहगाव, म्हाळसपिंपळगाव, मोरयाचिंचोरे, पिचडगाव, प्रवरासंगम, सुरेशनगर, तेलकुडगाव, वांजोळी, निपाणीनिमगाव, पिंप्रीशहाली, जानेवारी २०२१ मध्ये सर्वसाधारणसाठी आरक्षण निश्चित केलेल्या ग्रामपंचायती– जायगुडे आखाडा, लेकुरवाळे आखाडा, नेवासा बुद्रुक, वंजारवाडी.

## चंदनापुरी ते सावरगाव तळ रस्त्याचे काम दर्जेदार करा : आ. खताळ

**संगमनेर (तालुका प्रतिनिधी)** – राज्य सरकार व जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून चंदनापुरी ते सावरगाव तळ, पिंपळगाव माथा, जवळे बाळेश्वर या रस्त्यासाठी ६.५० कोटी रुपये दिले आहेत. त्यामुळे ठेकेदाराने या रस्त्याचे काम चांगल्या गुणवत्तेचे करावे, अशा सूचना आमदार अमोल खताळे यांनी दिल्या.

सदर रस्त्याचे रुंदीकरण आणि डांबरीकरण तसेच कौठमाळा ते काशीआई मंदिर सावरगाव तळ या रस्त्याचा शुभारंभ आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीनिवास वर्पे, शिवसेनेचे तालुकाध्यक्ष रामभाऊ रहाणे, प्रवरा बँकेचे संचालक प्रमोद रहाणे, भाजप ज्येष्ठ नेते दादाभाऊ गुंजाळ, शिवसेना उपतालुकाप्रमुख बादशाह गुंजाळ, दिनेश फटांगरे, सुशील शेवाळे, अजित जाधव, रोहिदास रहाणे, ग्रामपंचायत सदस्य अंकुश रहाणे, संगमनेर खुर्द गटप्रमुख श्याम रहाणे, पोलीस पाटील ज्ञानदेव रहाणे, सावरगाव तळच्या सरपंच अनिता नेहे, बाळासाहेब शेटे, परसराम नेहे, रावसाहेब थिटमे, पोपट नेहे, शरद नेहे, दादाभाऊ शिरतार, माधव रहाणे, एम. डी. रहाणे, बाळू सरोदे, नितीन रहाणे, सार्वजनिक बांधकाम विभाग अकोलेचे उपविभागीय अभियंता जगदीश कडाळे, डी. एम. ठाकरे, श्रीमती. ठाणेकर, ग्रामविकास अधिकारी रामदास काळे, सावरगाव तळच्या ग्रामसेविका माधुरी शिखरे आदी उपस्थित होते.

आमदार खताळ पुढे म्हणाले, रस्त्याचे काम होत असताना कुठलीही अडचण येऊ देऊ नका. आली तर सावरगाव तळ आणि चंदनापुरी येथील शेतकऱ्यांनी समन्वयातून मार्ग काढावा. पूर्वीसारखे आता कुणाचाही ठेकेदारांवर दबाव राहिला नाही. टक्केवारीचा तर विषय येतच नाही. त्यामुळे या रस्त्याचे काम चांगल्या गुणवत्तेचे करावे अशी सक्त ताकीद त्यांनी ठेकेदाराला दिली. इतरही काही विकासकामे राहिली असेल तर ती सर्व पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार आहे. परंतु आगामी होणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीत भगवा फडकविण्यासाठी महायुतीच्या पाठीमागे भक्कम उभे राहा. रस्त्याचे काम होत असताना ठेकेदाराला कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही. याची दोन्ही गावातील नेत्यांनी दक्षता घ्यावी रस्त्याचे काम ठेकेदाराने चांगल्या गुणवत्तेचे केले नाही तर त्यात दुरुस्ती करण्याची तरतूद आहे. त्यामुळे रस्त्याच्या कामाबाबत तुम्ही तुम्ही निश्चिंत राहा असाही सल्ला दोन्हीही गावच्या नागरिकांना दिला. प्रास्ताविक आणि स्वागत शिवसेनेचे तालुकाप्रमुख रामभाऊ रहाणे यांनी केले. तर आभार सावरगाव तळ शिवसेनेचे नेते शरद नेहे यांनी मानले.

## रामगिरी महाराजांच्या किर्तनाने वाकडी सप्ताहाची सांगता

**धनगरवाडी (वार्ताहर)**– राहाता तालुक्यातील वाकडी येथील सप्ताहाची महंत रामगिरी महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता झाली.



योगीराज गंगागिरी महाराज व नारायणगिरी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व महंत रामगिरी महाराज यांच्या प्रेरणेने ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व साईचरित्र पारायण निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह पार पडला. ज्ञानेश्वरी पारायण व्यासपीठ चालक अशोक महाराज ठेंग व साईचरित्र पारायण किशोर महाराज भालेराव यांच्या मार्गदर्शनाने पार पडले. रोज पहाटे काकडा भजन, सकाळी ज्ञानेश्वरी पारायण व साईचरित्र पारायण वाचन, संध्याकाळी हरिपाठ, रात्री सात ते नऊ कीर्तन त्यानंतर महाप्रसाद असे रोजचे कार्यक्रम पार पडले. काल्याचे किर्तनाने सप्ताहाची सांगता झाली.

सप्ताह काळात महंत दत्तगिरी महाराज, साध्वी सोनाली करपे, राजेश्वरगिरी महाराज, विश्वनाथगिरी महाराज, हरीशरणगिरी महाराज, मधुसूदनगिरी महाराज, अर्जुनगिरी, मृदुंगचार्य मधुकर महाराज, सुनील महाराज कोळपकर, विक्रम महाराज, गायनाचार्य रामभाऊ महाराज, गोरख महाराज जाधव, प्रसाद महाराज यांचे कीर्तन पार पडले. या सप्ताहात विठ्ठल–रुख्मिणी बाल भजनी मंडळाने हिरारीने सहभाग घेतला.

दरम्यान पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या पर्यटकांना महंत रामगिरी महाराज व समस्त वाकडी ग्रामस्थांच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.

## करजगावच्या कुबेरेश्वर महाराजांचा उद्यापासून यात्रौत्सव

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)**– राहुरी तालुक्यातील करजगाव येथील महाराष्ट्रातील एकमेव असलेल्या कुबेरेश्व महाराजांच्या यात्रेस उद्या सोमवार दि.२८ एप्रिल पासून प्रारंभ होत आहे. दोन दिवसांच्या या यात्रौत्सवात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



यात्रेनिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून सोमवारी सकाळी ७ ते १० वाजेपर्यंत नामांकित बँड पथकाच्या गजरात दक्षिण काशी असलेल्या पुणतांबा येथून भाविकांनी पायी चालत आणलेल्या गंगाजलाची भव्य कावड मिरवणूक निघणार आहे. तर सकाळी ११ वाजता ग्रामस्थांच्या वतीने महाआरती व नैवेद्य तसेच सायंकाळी ७ वाजता शोभेच्या दारूची अतिषबाजी व रात्री साडेसात वाजता भव्य असा मिरवणूक सोहळा निघणार आहे. मंगळवार दि. २९ रोजी दुपारी तीन ते सात वाजेपर्यंत भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले आहे.

यात्रोत्सव निमित्ताने मंदिराची रंग रंगोटी करण्यात आली असून मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. प्रवरा नदी उगमस्थानापासून कुठेही चंद्रकोर नसून कुबेरेश्वर मंदिराजवळ प्रवरा नदीने चंद्रकोर आकार घेतल्यामुळे या स्थानास विषेश महत्व असून भाविक या ठिकाणाला प्रती पंढरपूर मानतात. या देवस्थानाला परिसरातील कान्हेगाव, बेलापूर, ब्राह्मगाव भांड, चांदेगाव, जातप, लाख, टाकळीमिया, पढेगाव, राहुरीसह जिल्ह्यातील अनेक ठिकाणचे भाविक दर्शनसाठी येतात. याच ठिकाणी गावातील भाविक व विवाह होऊन गेलेल्या मुलीच्या व परिसरातील भविकाच्या सहकार्यातून जवळपास साडेतीन लाख रुपयांच्या ४० फुट उंचीचा त्रिशुळ उभारण्यात आला आहे. देवस्थान प्रवरा नदीकाठी निसर्गाच्या सानिध्यात असल्याने फार प्राचिन असून कुबेरेश्वर नवसाला पावणारा असल्याची भाविकांची श्रध्दा आहे. त्यामुळे या ठिकाणी यात्रा निमित्ताने बोलले नवस फेडण्यासाठी भाविक हजेरी लावतात.

या कार्यक्रमाचा परिसरातील भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कुबेरेश्वर देवस्थान ट्रस्ट, करजगाव ग्रामस्थ व श्री कुबेरेश्वर महादेव यात्रा कमिटीने केले आहे.

## आज ही सानेगुरूजी त्याच्या विचाराने जिवंत-वाणी

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)**–आज ही सानेगुरूजी त्याच्या विचाराने जिवंत आहे. खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे हा संदेश आज प्रत्येक घरात गेला पाहिजे असे प्रतिपादन सेवानिवृत्त शिक्षक अरविंद वाणी यांनी केले.

येथील आंतर भारती आयोजित मेरी बात व्याख्यानमालेतील १० पुष्प गुंफताना अरविंद वाणी बोलत होते. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य टी ई.शेळके म्हणाले प्रत्येक माणूस हा घडत असताना त्याच्या आजुबाजुला असणारे व्यक्ती व परिसर याचा फार मोठा प्रभाव असतो. साने गुरूजींचा सहवास लाभलेले अरविंद वाणी हे उतम उदाहरण आहे. आंतरभारती श्रीरामपूरचे अध्यक्ष यांनी मेरी बात व्याख्यानमालेतून आजतागायत आपणास वेगवेगळ्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय झाला. व्याख्यानमालेतून विचारांची देवाण–घेवाण होते. नवनवीन व्यक्तिमत्त्वाचा परिचय होतो. आज समाजातील व्यक्तींना सुसंवादची गरज आहे. त्यासाठीच आंतरभारती श्रीरामपूरने हा मेरी बात उपक्रम सुरू केला असल्याचे टी. ई.शेळके म्हणाले. मुख्याध्यापक भागवत मुठे यांनी आंतरभारती श्रीरामपूर शाखेच्या वतीने अध्यक्ष प्रा. सुभाष लिंगायत यांचे अभिनंदन केले. प्रास्ताविक व स्वागत लेविन भोसले यानी केले. दतात्रय रायपल्ली यांनी प्रमुख अतिथी अरविंद वाणी यांचा परिचय करून दिला.



याप्रसंगी प्रा.शिवाजीराव बारगळ, डॉ. बाबुराव उपाध्ये, कुंडलीक फाफाळे, जगन्नाथ वाघमारे, दिनकर वाणी, श्री.गालफाडे, भागवत मुठे, प्रदीप धुमाळ, सुखदेव सुकळे आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ.बाबुराव उपाध्ये यांनी आंतर भारती.श्रीरामपूर आयोजित मेरी बात कार्यक्रमातून समाजातील सर्व स्तरातील लोकांपर्यंत सानेगुरुजी चे विचार पोहचणयाचे महान कार्य कौतुकास्पद आहेत त्यासाठी सर्वांनी अध्यक्ष प्रा. सुभाष लिंगायत यांना सहकार्य करावे, असे आवाहन करुन आभार मानले.

## फडणवीसांना २०८० पर्यंत मुख्यमंत्री राहू द्या

### बावनकुळेंच्या वक्तव्यावर शिंदे गटाचा टोला

**मुंबई (प्रतिनिधी)**– मुख्यमंत्रिपदावरून भाजप आणि शिवसेना शिंदे गटात सुरू असलेली धुसफूस शनिवारी चव्हाट्यावर आली. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी देवेंद्र फडणवीस हेच २०३४ पर्यंत मुख्यमंत्री राहतील, असा दावा केल्यानंतर शिंदे गटाकडून फडणवीस यांना २०८० पर्यंत मुख्यमंत्री राहू द्या, असा सणसणीत टोला लगावण्यात आला.

चंद्रशेखर बावनकुळे यांनी एका कार्यक्रमादरम्यान देवेंद्र फडणवीस हे सर्वोत्कृष्ट मुख्यमंत्री आहेत. त्यांनी विकसित महाराष्ट्राचा संकल्प केला आहे. ते २०३४ पर्यंत मुख्यमंत्री कायम राहतील. त्यांच्याशिवाय विकसित महाराष्ट्राचे स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही, असा दावा केला. त्यांच्या या दाव्याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना प्रसारमाध्यमांनी विचारले असता त्यांनी त्यावर बोलणे टाळले. त्यांनी केवळ शुभेच्छा म्हणत हात जोडले.

याबाबत शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनी २०३४ कशाला २०८० पर्यंत त्यांना मुख्यमंत्री राहू द्या, असा टोला लगावला. २०८० पर्यंत मुख्यमंत्री झाले तरी आमची काय हरकत आहे. बावनकुळे, फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांनाही शुभेच्छा. कुणी आमच्यात आग लावण्याचा प्रयत्न केला तरी आमच्या मतभेद होणार नाहीत, असे म्हणत रामदास कदम आपली बाजू सावरली.

## महिला व बालविकास विभाग आधार केंद्र चालकांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**राहाता (तालुका प्रतिनिधी)** – महिला व बालविकास विभाग यांचे आधार नोंदणीचे काम हे व्हीएलई यांचे मार्फतच सुरु ठेवावे, असे निवेदन अखिल भारतीय सीएससी महा–ई सेवा केंद्र व आधार केंद्र युनियन यांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.




या निवेदनामध्ये म्हटले आहे, महाराष्ट्र राज्यात महा– ई सेवा केंद्र संचालक यांचे माध्यमातून गोरगरीब जनतेला राज्य शासनाचे विविध सेवा व सुविधा तसेच शासकीय योजना ग्रामीण व शहरी भागात ऑनलाईन पद्धतीने पोहचविण्याचे कार्य ग्रामीण भागातील सेवा केंद्र चालक मागील १२ ते १२ वर्षापासून करत आहोत. शासकीय यंत्रणसोबत आम्ही हातात हात घालून शासनाच्या सर्व सेवा या जनतेपर्यंत पोहच करत आहोत. असे असताना मागील तीन वर्षापासून महिला व बालविकास विभागाचे आधार नोंदणीचे काम हे आमच्या मार्फत सुरळीत सुरु असताना आम्हाला किंवा आम्ही महा–आई टी या शासकीय संस्थेसोबत आधार नोंदणीचे काम सुरळीत सुरु असताना अचानक सदरील काम बंद करून ते काम एका कंपनीला देण्याचा घाट घालण्यात आला. त्यामुळे राज्यातील दोन हजार आधार केंद्र चालकांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे. ज्या कंपनीला काम दिले, त्या कंपनीने आपली मनमानी सुरु केली आहे. आम्ही महा–आई टी सोबत जे आधार नोंदणीचे काम केले आहे त्याचे आम्हाला शासनाकडून पैसे येणे बाकी आहे. त्यापोटी आम्ही शासनाला पन्नास हजार रुपये इतकी अनामत रक्कम दिली आहे. असे असताना अचानक काम बंदचा घाट का? असा प्रश्न निवेदनाव्दारे विचारला आहे. तरी सदरील आधार नोंदणीचे काम बीएलई मार्फतच सुरु ठेवावे, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी युनियनचे शैलेन्द्र भोईटे, यशवंत गावंडे यांच्यासह अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व आधार केंद्र चालक उपस्थित होते.